PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI
ELECTRIC SUPPLY &
TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

16/7/2015

कृपया प्रसिध्दीकरिता सादर,
संपादक/वृत्तसंपादक (श्री. हनुमंत गोफणे)
जनता संपर्क अधिकारी
दूरध्वनी क्र. २२८४१२५५/२२८१६६५६

प्रसिध्दी पत्रक क्र.२३
दिनांक : १६.०७.२०१५

वस्तुस्थितीची शहानिशा न करता दिशाभूल करणा-या बातम्यांबाबत

मुंबई, १६ - बेस्ट उपक्रमाच्या वीजग्राहकांना पाठविण्यात आलेल्या वाढीव विद्युत देयकांच्या संदर्भात दिनांक १५-०७-२०१५ रोजी वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या बातम्यांबाबत सदर बाब आहे. बातम्यांमध्ये अंतर्भूत असलेली काही विधाने वस्तुस्थितीची शहनिशा न करता तसेच सदर समस्यांच्या बाबतीतील अतिशयोक्ती करुन आणि प्रमाणाबाहेर विस्तारित करुन प्रसारित करण्यात आली आहेत. त्याबाबत बेस्ट उपक्रमाकडून तीव्र आक्षेप घेण्यात येत आहे. वस्तुस्थितीवर आधारित असलेल्या सदर बाबीचे अचूक तपशील पुढीलप्रमाणे आहे.

बेस्टच्या विद्युत विभागाची बिले तयार करणा-या प्रणालीमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे मे महिन्याच्या १३ ते १७ या बिलिंग सायकलमधील ग्राहकांना उपक्रमाच्या स्टँडबाय बिलींग सिस्टीमद्वारे मे महिन्याचे अंतरिम देयक सादर केले त्या बिलामध्ये, हे वीज देयक काही तांत्रिक अडचणीमुळे मे महिन्याच्या वीज वापराच्या आधारे बनवून अंतरिम देयक म्हणून सादर करण्यात येत आहे. या देयकानुसार भरणा केलेली रक्कम जून महिन्याच्या वीज देयकात समायोजित करण्यात येईल, 'तसदीबद्दल क्षमस्व' असा संदेश छापला होता.

तांत्रिक दोषाचे निवारण झाल्यानंतर जून २०१५ महिन्याचे विद्युत देयके मे व जून या दोन महिन्याच्या प्रत्यक्ष मीटर वाचनाच्या आधारे तयार करण्यात आली.

मे महिन्याच्या देयकाचे प्रदान करणा-या जवळपास २७,००० वीजग्राहकांनी देयकाचे प्रदान जून महिन्याचे वीज देयक तयार करण्याच्या वेळी किंवा तदनंतर केले असल्यामुळे त्याचा समावेश जून महिन्याच्या बिलामध्ये केला गेला नाही. त्यामुळे प्रत्यक्ष बिलाची रक्कम वाढीव दिसून आली. या सर्व २७,००० ग्राहकांची प्रदान रक्कम जुलै महिन्याच्या बिलामध्ये समायोजित येणार आहे. तसेच या ग्राहकांना मे महिन्याचे भरलेल्या देयकाची रक्कम

—२

वगळून उर्वरित जून महिन्याची रक्कम भरण्यास सांगितले आहे व तशा सूचना वीजदेयक केंद्रामधील कर्मचा-यांना आधीच देण्यात आल्या आहेत. मे महिन्याचा विद्युत प्रदान जमा न केलेल्या ग्राहकांचा विलंब प्रदान आकार व थकबाकीवरील व्याज आकारण्यात आले नाही. त्यामुळे वृत्तपत्रांमध्ये छापलेले अडीच लाख ग्राहकांना पाच ते सहा पट बिल पाठविले हे वृत्त पूर्णपणे चुकीचे व निराधार आहे

या जून महिन्याच्या बिलामध्ये मागील वर्षीच्या जून महिन्याच्या वीज वापराच्या युनिटच्या तुलनेने जास्त युनिट दर्शविले आहेत. प्रत्यक्षात ते मे व जून असे दोन महिन्याचे एकत्रित युनिट आहेत. प्रत्येक महिन्याच्या आवश्यक टप्प्याच्या लाभासह (Slab benefit) हे देयक बनविण्यात आले असून ते प्रत्यक्ष मीटर वाचनावर आधारित बिल आहे त्यामुळेच वृत्तपत्रात अतिशयोक्ती करुन प्रमाणाबाहेर विस्तारित करुन चुकीची बातमी प्रदर्शित केल्याचे दिसून येते.

आपण आपल्या वृत्तपत्रामध्ये वरील बाबींचा खुलासा करण्यात यावा, ही विनंती.

—

PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI
ELECTRIC SUPPLY &
TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी
पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा
आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१

For favour of Publication
The Editor/News Editor,

16/7/15

(Hanumant K. Gophane)
Public Relations Officer
22841255/22816656

Press Note 23
Date : 16.07.2015

Misleading news without verifying the facts

Mumbai, 16 - This has reference to the news item published in newspapers on 15/07/2015 with regards to inflated bills presented to electricity consumers of BEST Undertaking. We vehemently refute some of the statements contained in the news report, which it seems were made without verifying facts and has exaggerated magnitude of the problem beyond all proportions. The accurate version of the matter based on the facts is as follows:

As an interim measure, the electricity bills for 5 cycles i.e. from cycle 13 to 17 of bill month May' 2015 were generated through standby billing system due to technical problem in regular billing system. The technical problem was attended and billing of June' 2015 for these cycles was done through regular billing system. The combined billing in the regular system was done for two months i.e. May' 2015 and June' 2015 based on actual meter readings of individual months along with necessary slab benefit for each month. The payment received against the interim billing was adjusted in this bi-monthly billing of June' 2015.

...2

वगळून उर्वरित जून महिन्याची रक्कम भरण्यास सांगितले आहे व तशा सूचना वीजदेयक केंद्रामधील कर्मचा-यांना आधीच देण्यात आल्या आहेत. मे महिन्याचा विद्युत प्रदान जमा न केलेल्या ग्राहकांचा विलंब प्रदान आकार व थकबाकीवरील व्याज आकारण्यात आले नाही. त्यामुळे वृत्तपत्रांमध्ये छापलेले अडीच लाख ग्राहकांना पाच ते सहा पट बिल पाठविले हे वृत्त पूर्णपणे चुकीचे व निराधार आहे

या जून महिन्याच्या बिलामध्ये मागील वर्षीच्या जून महिन्याच्या वीज वापराच्या युनिटच्या तुलनेने जास्त युनिट दर्शविले आहेत. प्रत्यक्षात ते मे व जून असे दोन महिन्याचे एकत्रित युनिट आहेत. प्रत्येक महिन्याच्या आवश्यक टप्प्याच्या लाभासह (Slab benefit) हे देयक बनविण्यात आले असून ते प्रत्यक्ष मीटर वाचनावर आधारित बिल आहे त्यामुळेच वृत्तपत्रात अतिशयोक्ती करुन प्रमाणाबाहेर विस्तारित करुन चुकीची बातमी प्रदर्शित केल्याचे दिसून येते.

आपण आपल्या वृत्तपत्रामध्ये वरील बाबींचा खुलासा करण्यात यावा, ही विनंती.

—